# उपसंहार : *तुमच्या आंतरिक आणि बाह्य दृश्याचे नूतनीकरण करणे*

७ जून, २०२४

आत्मीय वाचक,

या वर्षाच्या मार्च महिन्यापासून आपण सर्व जण आपल्या श्रीगुरू, गुरुमाई चिद्विलासानंद यांनी आपल्याला प्रदान केलेल्या सहा शिकवणी वाचत आलो आहोत, त्यांचे अध्ययन करत आहोत आणि यांविषयीच्या आपल्या अंतर्दृष्टींची देवाणघेवाण एकमेकांसमवेत करत आलो आहोत. या शिकवणींचे शीर्षक आहे : *तुमच्या आंतरिक आणि बाह्य दृश्याचे नूतनीकरण करणे.* या शिकवणींची व्याप्ती फार मोठी आहे—अनेकदा माझ्या मनात विचार आला आहे की, यांमध्ये तर सिद्धयोग साधनेविषयी ‘अथपासून इतिपर्यंत’ सर्व काही समाविष्ट आहे. यांमध्ये प्राचुर्य आहे, विविधता आहे आणि तरीदेखील एक विशिष्ट स्वरूप आहे जे या सर्व शिकवणींना एका सूत्रात गुंफून ठेवते आणि हीच बाब यांच्या शीर्षकात अचूकपणे समाविष्ट आहे.

श्रीगुरुमाईंनी जेव्हा पहिल्यांदा मला सांगितले की, या शिकवणींना *तुमच्या आंतरिक आणि बाह्य दृश्याचे नूतनीकरण करणे* असे शीर्षक देण्याची त्यांची इच्छा आहे, तेव्हा मी ही गोष्ट पाहून प्रभावित झाले की, हे शब्द किती *अचूक* वाटत आहेत, किती अनिवार्य वाटत आहेत. हे जणू काही असेच होते की, या शिकवणींचे शीर्षक हेच *असणार* होते आणि गुरुमाईंनी एखाद्या सुगंधित वायूमधून ते वेचले असावे, जेणेकरून आपल्यालाही त्याचा सुगंध आपल्या श्वासात भरून घेता यावा. सिद्धयोग मार्गावर आपण नेहमीच ‘पुन्हा नूतनीकरण करणे’ याविषयी बोलतो. आपण अनेक नवीन आरंभांचा उत्सव साजरा करतो; आपण वेगवेगळ्या संस्कृतींच्या व परंपरांच्या नववर्षांचा सन्मान करतो. ही गोष्ट त्याच विश्वासाचा एक भाग आहे जो मी श्रीगुरुमाईंकडून सदैव अनुभवला आहे, त्यांचा असा विश्वास की, मानवामध्ये अमर्याद क्षमता आहे बदलण्याची, विकसित होण्याची आणि आपल्या अंतरी अशी नवीनता आणण्याची की, तीच नवीनता—विरोधाभासी रूपाने—मानवाला त्याच आत्मस्वरूपापर्यंत परत घेऊन येते, जे सदासर्वदा मानवाचे मूळ स्वरूप आहे.

गुरुमाईंनी एकदा मला एका वयोवृद्ध मनुष्याची गोष्ट सांगितली होती, जे एका सत्संगानंतर बाबांचे दर्शन घेण्यास आले होते. ते ऐंशी वर्षांचे होते आणि सिद्धयोग मार्गाशी त्यांचा नुकताच परिचय झाला होता. ते जेव्हा बाबांसमोर आले, तेव्हा त्यांनी बाबांना विचारले की, साधना सुरू करण्याच्या दृष्टीने ते

जास्त वयस्कर आहेत का? बाबांनी त्यांच्याकडे पाहून स्मित केले आणि म्हणाले, “साधना सुरू करण्यासाठी कोणीही कधी जास्त वयस्कर नसतो. साधना कोणत्याही वयात सुरू करता येते. आणि जर तुम्ही समर्पित होऊन ती केलीत, तर साधनेचे फळ निश्चितच प्राप्त कराल.”

मी जेव्हा ‘नूतनीकरण करणे’ या विषयावरील गुरुमाईंच्या या शिकवणी वाचल्या, तेव्हा माझ्या अंतरीदेखील तोच भाव जागृत झाला, जो त्या वयोवृद्ध मनुष्याला बाबांचे शब्द ऐकून जाणवला असावा असे मला वाटते. एकीकडे मला या गोष्टीने आश्वासित वाटते की, माझे वय कितीही जरी वाढले किंवा काल जे काही घडले किंवा मला कितीही वेळा जरी असे वाटले की, मी प्रयत्न केला पण मी अपयशी ठरले आहे, तरीदेखील मी आत्ता या क्षणी स्वतःला पुन्हा नवीन करू शकते. यामध्ये विस्तार पावण्याचा आणि सर्व काही शक्य असल्याचा एक भावदेखील आहे—यामध्ये एक आमंत्रण आहे की, मी या जगताला पाहण्याच्या आणि त्यामध्ये जगण्याच्या माझ्या त्या पद्धतींचे पुनर्मूल्यांकन करावे, ज्या मी “बरोबर” मानल्या असतील अथवा असे मानले असेल की, आचरण व विचार करण्याच्या माझ्या स्वभाव-वैशिष्ट्यांनुसारच मी माझ्या आकांक्षाचा आवाका ठरवावा, त्याहून अधिक नाही. मी गुरुमाईंना हे सांगताना ऐकले आहे की, जेव्हा लोकांना असे विचारले जाते की, ते एखाद्या विशिष्ट पद्धतीनेच का वागतात, तेव्हा ते लोक त्यांचे हात वर करतात आणि चुकीच्या समजुतीने म्हणतात, “मी तर हा असाच आहे!” हे वाक्य ते अशा पद्धतीने म्हणतात की, जणू हे एक निर्विवाद सत्य असावे, जणू काही त्यांच्या वागणूकीत आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वात बदल करण्यासाठी त्यांच्याकडे कोणतेही साधन किंवा क्षमताच नसावी आणि त्याचबरोबर याविषयी प्रश्न विचारण्याचे कोणतेच कारणही नसावे की, का ते नेहमी अशा प्रकारे जगत आले आहेत.

पण गुरुमाई आपल्याला जे सांगत आहेत, त्याविषयी आपण जर खरोखरच गांभीर्याने विचार केला—हेच की, आपल्या आंतरिक आणि बाह्य दृश्याचे *नूतनीकरण* खरोखर करता येऊ शकते—तर आपल्याला त्या सीमिततांमध्ये निहित असलेला तो भ्रम दिसू लागतो, ज्याला आपण बऱ्याच काळापासून खरे मानले आहे. काहीतरी नवीन आणि जे *वास्तवात* खरे असेल, ते अंतरी उदित होऊ देण्यासाठी आपण आपल्या अंतरी जागा बनवतो. श्रीगुरूंच्या शिकवणींच्या मार्गदर्शनाने आणि श्रीगुरूंच्या कृपेचे पाठबळ असल्याने आपण विलक्षण प्रगती करू शकतो.

***

अनेक प्रसंगी, श्रीगुरुमाईंनी सांगितले आहे की, सिद्धयोगाच्या शिकवणी प्रदान करण्याचा त्यांचा संकल्प हा आहे की, लोकांनी स्वतःला खरोखर जाणावे. यांपैकी एक मुख्य पैलू आहे ‘आत्म्याला जाणणे’—म्हणजे परम आत्म्याला, त्या दिव्यतेला जाणणे, जी या ब्रह्मांडातील प्रत्येक वस्तूत आणि आपल्या

अंतरी विद्यमान आहे. तथापि, यामध्ये ते पैलूदेखील अपरिहार्यपणे समाविष्ट आहेत ज्यांयोगे आपल्याला स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये चांगल्या प्रकारे कळावीत : आपल्या सवयी, आपले इतिहास, आपल्या अनोख्या प्रवृत्ती. अखेरीस, जीवात्म्याद्वारेच तर परम आत्म्याला जाणता येऊ शकते.

या गोष्टीचे मला नेहमी आश्चर्य वाटते की, कशा प्रकारे श्रीगुरुमाई त्यांच्या शिकवणींमध्ये आपल्या दररोजच्या सामान्य वाटणाऱ्या कार्यांची उदाहरणे देत असतात, म्हणजेच ती कार्ये जी आपण जाणतेपणी किंवा अजाणतेपणी करतो, त्या दैनिक घटना ज्यांच्याशी आपला सामना होतो—या उदाहरणांद्वारे गुरुमाई आपल्याला हे दर्शवतात की, यांमध्येदेखील आपल्यापाशी अशा सुसंधी असतात, ज्यांद्वारे आपण त्या सत्याच्या संपर्कात येऊ जे आपण खरोखरच आहोत.

'नूतनीकरण करणे' याविषयी दिलेल्या सहा शिकवणींच्या बाबतीतही असेच आहे. 'पुन्हा नामकरण करणे'चे उदाहरण घ्या, ज्याविषयी श्रीगुरुमाई पहिल्या शिकवणीत सांगतात. आपण जगतात ज्या प्रकारे गोष्टी समजून घेतो आणि ज्या प्रकारे आपण जगतो किंवा कार्य करतो, ते बऱ्याच प्रमाणात त्या नावांवर आधारलेले असते जी आपण दिलेली असतात : लोकांना, स्थळांना, वस्तूंना. नाव हे ओळखीचे सर्वात पहिले व नजीकचे चिह्न आहे, आपल्या इंद्रियांद्वारे आपण सतत जी माहिती ग्रहण करतो आहोत, तिचे वर्गीकरण करण्याचे आणि ती सुव्यवस्थित करण्याचे ते साधन आहे. नाव हे दर्शवते की, अमुक व्यक्ती कोण आहे; नाव हेदेखील दर्शवू शकते की, ती व्यक्ती कुठून आली आहे, ती कोणत्या समुदायाची किंवा संस्कृतीची आहे, इतकेच नव्हे तर नाव हेदेखील दर्शवू शकते की, त्या व्यक्तीला कोणत्या दृष्टिकोणातून पाहिले पाहिजे. अशा प्रकारे, नाव हे विस्तार घडवून आणण्यास मदत करू शकते आणि तितक्याच सहजतेने ते सीमिततादेखील निर्माण करू शकते.

कदाचित हेच कारण असावे की, आपल्याला इतिहासातील आणि त्याबरोबरच वर्तमान काळातील अशी काही उदाहरणे सापडतात, ज्यांमध्ये लोक 'पुन्हा नामकरण करण्याची' प्रक्रिया करतात. ज्या देशांनी एखाद्या विदेशी सत्तेच्या शासनातून मुक्त झाल्यानंतर त्यांचे स्वातंत्र्य पुन्हा प्राप्त केले असेल, त्या देशांच्या संदर्भात आपण हे पाहतो. कदाचित वसाहतवादी शासनाच्या अंतर्गत, या प्रांतांच्या नगरांना, शहरांना आणि राज्यांना विशिष्ट नावे दिली जातील; आणि एकदा का त्या शासनाचे निर्बंध काढून घेतले गेले की, ती नावेदेखील काढून घेतली जातील व राष्ट्रीय किंवा सांस्कृतिक ओळखीच्या आधारावर स्पष्टपणे पुष्टिकरण करत, ठामपणे दावा करत त्या स्थानांना पुन्हा त्यांची मूळ नावे दिली जातील.

आपण धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरांमध्येदेखील असे घडताना पाहतो. जे लोक संन्यासदीक्षा घेतात, ते त्यांच्या मूळ नावाचा त्याग करून एक नवीन नाव किंवा उपाधी ग्रहण करतात, जी आता त्या परंपरेला अनुरूप असते जिच्यामध्ये त्यांना दीक्षा मिळालेली असते. त्यांचे पुन्हा नामकरण होणे हे सांसारिक जीवनाच्या बंधनांचा त्याग करण्याच्या त्यांच्या निर्णयाचे प्रतीक असते. हे त्यांच्या संन्यासाचे आणि त्यांनी निवडलेल्या मार्गाप्रति असलेल्या त्यांच्या समर्पणाचे सूचक असते.

श्रीगुरुमाई त्यांच्या शिकवणीत आपल्याला प्रोत्साहित करतात की, आपण पुन्हा नामकरण करण्याचा हा सिद्धान्त स्वीकारावा—नावांमध्ये समाविष्ट असलेल्या शक्तीचा उपयोग करावा—आणि तो आपल्या आंतरिक दिव्यतेवर लागू करावा. ज्या प्रमाणे, आपण आपल्या जीवनाच्या एखाद्या बाह्य पैलूला जेव्हा नवीन नाव देतो, तेव्हा ते आपल्याला त्या पैलूकडे नवीन दृष्टिकोणातून पाहण्यासाठी प्रोत्साहित करू शकते, त्या प्रमाणेच आपल्या अंतरात्म्याला दिले गेलेले नवीन नावदेखील आपल्याला प्रेरित करू शकते की, आपण आपल्या अंतरात्म्याला नवीन दृष्टिकोणातून पाहावे आणि त्याच्याशी असलेल्या आपल्या संबंधामध्ये नावीन्य आणावे. एक नाव ज्याप्रमाणे एखाद्या भौतिक क्षेत्रावर दावा करण्यासाठी, ते क्षेत्र प्राप्त करण्यासाठी उपयोगात आणता येते, त्याचप्रमाणे नाव ते *आंतरिक* क्षेत्र पुन्हा प्राप्त करण्यासाठी मदत करू शकते, ज्याच्या असण्याची आपल्याला कधी जाणीवही नव्हती. [प्रभावशाली रूपाने, या शिकवणीमध्ये गुरुमाई ‘पुन्हा नामकरण करणे’ याबरोबरच ज्या दोन इतर कार्यांकडे आपले लक्ष वेधतात, ती आहेत ‘पुन्हा प्राप्त करणे,’ आणि ‘पुन्हा रचना करणे’.]

आपण जे कायम करतो—आणि जे आपल्या आंतरिक दिव्यतेचे प्रवेशद्वार आहे—त्याचे आणखी एक अचूक उदाहरण आहे, ‘श्वास घेणे’. ‘नूतनीकरण करणे’ या शिकवणींमध्ये आणि विशेषतः सहाव्या शिकवणीमध्ये गुरुमाई श्वास घेण्याविषयी सांगतात. मी श्रीगुरुमाईंच्या या सांगण्याने आश्चर्यचकित झाले की, *आपोआप होत राहणारे* श्वसनदेखील आपल्याला आंतरिक जगताच्या सखोलतेविषयी काही सांगू शकते. श्रीगुरुमाई ‘तो उसासा, तो दीर्घ श्वास’ या गोष्टीचा उल्लेख करतात, ज्यामध्ये गोष्टीतील मुख्य पात्राचा एक साधासा उसासा त्याच्या सर्वात तीव्र उत्कंठेचा पुरावा आहे. तुम्हाला हे ओळखीचे वाटत नाही का? याविषयी विचार करा : तुम्ही तुमच्या साथीदारासमवेत तुमच्या लग्नाचा वाढदिवस जेव्हा साजरा करू शकत नाही किंवा तुम्ही तुमच्या मुलाच्या गायनाच्या वा काव्यवाचनाच्या कार्यक्रमाला जेव्हा पोहोचू शकत नाही किंवा एखाद्या दुसऱ्या व्यक्तीबरोबर असण्याची तुमची इच्छा असते किंवा तुम्ही एखाद्या अन्य स्थानी जाऊ इच्छिता; पण तुम्ही तसे करू शकत नाही, तेव्हा तुम्ही एक उसासा सोडत नाही का? एक दीर्घ उच्छ्वास सोडत नाही का? त्या वेळी तुमचा उच्छ्वास हा तुमचे प्रेम, तुमच्या हृदयातील सखोल व चिरस्थायी स्नेह तितकाच प्रकट करतो, जितका तो तुमचा खेद प्रकट

करतो. या निराशेमध्ये समाविष्ट आहे, स्वतःविषयी काही जाणण्याची संधी, आपल्या हृदयाची प्रेरणा, हृदय जी साद घालते आहे तिच्यासमवेत आणखी एकलय होण्याची संधी.

***

ही केवळ दोन उदाहरणे आहेत, एक आहे 'नूतनीकरण करणे' या शिकवणींच्या आरंभीच्या शिकवणीतील आणि दुसरे आहे समापनाच्या शिकवणीतील. पण या शिकवणींमध्ये गुरुमाई *तुमच्या आंतरिक व बाह्य दृश्यांचे नूतनीकरण* करण्याची इतर अनेक साधने व अभ्यास तसेच अनेक पद्धती प्रदान करतात, ज्यांचे अन्वेषणदेखील तितक्याच विस्तृतपणे करता येऊ शकते.

माझा असा अनुभव आहे की, आपण साधनेमध्ये जितके प्रयत्न करतो, त्यांची फळे तितकी संचित होत जातात. हे प्रयत्न एकमेकांकडून आधार प्राप्त करतात, त्यांना एकमेकांकडून बळ व ऊर्जा मिळते आणि श्रीगुरूंच्या कृपेने ते प्रयत्न उंची गाठतात, उन्नत होत जातात. श्रीगुरुमाईंनी तिसऱ्या शिकवणीत आपल्याला एक अभिकथन प्रदान केले होते आणि त्याचे पुनरुच्चारण करत राहायला सांगितले होते. मी त्या अभिकथनावर सखोलतेने विचार करते आहे. त्या अभिकथनाची शेवटची ओळ आहे, "माझी साधना करण्याचे माझे सर्व प्रयत्न आता प्रयत्नहीनतेच्या प्रभेने चमकतील कारण मी हे जाणतो की, कृपा माझी सांगाती आहे."

काही दिवसांपूर्वी मी गुरुमाईंना या ओळीविषयी आणि विशेषतः प्रयत्न करणे व प्रयत्नहीनता यांच्यातील संबंधाविषयी विचारले. या प्रश्नाचे उत्तर देताना श्रीगुरुमाईंनी एका कलाकाराची उपमा दिली—तो कोणत्याही क्षेत्रातील कलाकार असू शकतो, संगीतकार, चित्रकार, लेखक, अभिनेता, नर्तक. एका कलाकारासाठी हे गरजेचे असते की, त्याने आधी आपली कला सादर करण्याच्या कौशल्यात निपुणता प्राप्त करावी, ती कला शिकण्यासाठी आवश्यक असलेला वेळ देऊन आपल्या कलेची मूळ तत्त्वे, तिचे मूळ सिद्धान्त शिकावेत. अखेरीस, दररोज व सातत्याने असे करत राहिल्याने तो त्या सिद्धान्तांच्या मर्यादा व बंधने पार करू शकतो. आपल्या संगीताच्या सूरांच्या हरकतींमध्ये, चित्र रंगवण्यासाठी ब्रश वापरण्याच्या आपल्या पद्धतीमध्ये, आपल्या शब्दांना स्वतःच वाक्याचा आकार घेताना पाहण्यामध्ये त्या कलाकाराला स्वातंत्र्य गवसते. अनुशासन परिवर्तीत होते, कलेमध्ये.

गुरुमाईंनी मला हेदेखील समजावले की, आपल्याला जेव्हा ती गोष्ट 'आवडते,' जी करण्यासाठी आपण प्रयत्न करत असतो—जेव्हा आपल्याला प्रयत्न करण्यात आनंद मिळतो किंवा तो प्रयत्न करण्यासाठी जेव्हा आपल्याला प्रेरणा मिळते—तेव्हा आपल्याला असे वाटतच नाही की आपण 'प्रयत्न' करत आहोत. श्रीगुरुमाईंनी सांगितले की, या दृष्टीने पाहता प्रयत्न हा प्रेमासमान आहे. होय, प्रत्येक वस्तूप्रति,

प्रत्येक जीवाप्रति प्रेम व्यक्त करता येऊ शकते—पण जेव्हा तुम्हाला कोणीतरी असे किंवा काहीतरी असे मिळते ज्याच्यावर प्रेम करणे *सोपे* असते, तेव्हा प्रेम अभिव्यक्त करणे आणखीनच सहज-स्वाभाविक होत नाही का?

मला खूप आनंद वाटतो की, एक सह-सिद्धयोगीच्या नात्याने मी तुमच्याशी संवाद साधते आणि तुमचे अनुभव वाचते ज्यांमध्ये तुम्ही वर्णन करता की, कशा प्रकारे तुम्ही श्रीगुरुमाईंच्या या शिकवणींचा अभ्यास करत आहात. तुम्ही तुमच्या अनुभवांमध्ये जे काही सांगितले आहे, त्यामधून ते सर्व मुद्दे दिसून येतात की, ज्यांचा मी आत्ता उल्लेख केला आहे—साधनेप्रति वचनबद्धता, या समर्पित प्रयत्नांच्या प्रभावांमध्ये कशा प्रकारे वृद्धी होत जाते आणि याच्या फलस्वरूप होणारे ते सूक्ष्म व मोठे रूपांतरण. उदाहरणार्थ, तुमच्यापैकी एका व्यक्तीने अलीकडेच असे लिहिले :

> "माझ्यासाठी श्रीगुरुमाईंच्या शिकवणींच्या या संग्रहाचे एक सर्वात महत्त्वाचे फळ हे आहे की, माझ्या स्वतःच्या साधनेशी असलेल्या माझ्या संबंधात बदल झाला आहे. मला वाटते की, या शिकवणी मला अधिक आत्मविश्वास प्रदान करत आहेत आणि त्याबरोबरच माझे स्वतःचे 'आंतरिक दृश्य' समजून घेण्याच्या, त्याचे वर्णन करण्याच्या आणि ते अनुभवण्याच्या माझ्या शब्दसंग्रहातदेखील वृद्धी होते आहे. सर्वात मोठी बाब ही आहे की, या शिकवणींनी मला प्रोत्साहित केले आहे की, मी माझ्या साधनेप्रति एक प्रसन्नतापूर्ण साहसी कार्याची भावना ठेवावी. . ."

मी कल्पना करते की, माझ्याप्रमाणेच तुमच्यापैकी अनेक लोकदेखील या शिकवणी पुन्हापुन्हा वाचतील. जेव्हा तुम्ही असे कराल, तेव्हा तुम्ही निश्चितच नवीन काहीतरी शोधून काढाल—शिकवणींविषयी आणि स्वतःविषयीदेखील. प्रत्येक शिकवणीत ज्या गोष्टींचा उल्लेख केला आहे, त्या गोष्टी तुम्ही इंग्रजी शिकवणीखाली दिलेल्या लिंकवर क्लिक करून पुन्हा वाचू शकता; या गोष्टी तुमच्या अध्ययनाला आधार प्रदान करण्यासाठी व अध्ययन पुढे नेण्यासाठी पुनर्लिखित आहेत व भाषांतरासह दिलेल्या आहेत तसेच या गोष्टींचे इंग्रजी ऑडिओ रेकॉर्डिंग्जही उपलब्ध आहेत.

तुम्ही या शिकवणींसह दिलेल्या दृश्यांसमवेतही थोडा वेळ घालू शकता. मी आधीदेखील लिहिले आहे की, कशा प्रकारे सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटच्या विविध डिझाईन्सचा व कलाकृतींचा बरेचदा एक विशेष अर्थ असतो, विशेष विचारान्ती त्यांची रचना केलेली असते. 'नूतनीकरण करणे' शिकवणींच्या बाबतीतही असेच आहे. तुम्ही पाहिलेच असेल की, प्रत्येक शिकवणीचे पृष्ठ हे चांदी ठोकून बनवलेल्या

एका पत्र्यासारखे आहे. गुरुमाईंनी मला सांगितले की, जेव्हा त्या या शिकवणी लिहित होत्या, तेव्हा चांदीच्या या पत्र्याचे चित्र त्यांच्या मनात आले.

मी नेहमीच अनुभवले आहे की, श्रीगुरुमाई आणि एकलयता, एकच आहेत, त्यामुळे हे जाणणे कदाचित आश्चर्यजनक नाही—आणि त्याबरोबरच हे जाणणे विस्मयजनकही आहे—की चांदीमध्ये व विशेषतः चांदीच्या पत्र्यामध्ये ते गुण असतात, जे या शिकवणींशी सुसंगत आहेत. शुद्ध चांदी चमकदार असते, जी प्रकाशाला सर्वात अधिक प्रतिबिंबित करणाऱ्या धातूंपैकी एक आहे आणि तिला गंजही लागत नाही व ती खराबदेखील होत नाही. त्याबरोबरच, चांदी इतकी मऊ आणि लवचीक असते की, तिला न तोडता, ठोकून पातळ पत्र्याचे वा सुंदर आकारांचे रूप देता येते. जेव्हा चांदीवर अशा प्रकारे कार्य केले जाते, तेव्हा ती अधिक मजबूत व अधिक टिकाऊ बनते. संपूर्ण इतिहासात, चांदीच्या पत्र्यापासून बहुमूल्य वस्तू तयार केल्या गेल्या आहेत, जसे की, दागिने, नाणी, सजावटीच्या वस्तू आणि धार्मिक व आध्यात्मिक अनुष्ठानांमध्ये उपयोगात आणले जाणारे सामान.

मला वाटते की, ही उपमा स्पष्ट आहे. ती उत्साहवर्धकदेखील आहे. तुमच्यापैकी अनेक लोकांनी हे सांगितले आहे की, गुरुमाईंच्या या शिकवणी अगदी अचूक वेळी तुम्हाला प्राप्त झाल्या आहेत. तुम्हाला पूर्ण विश्वास होता की, श्रीगुरुमाई थेट तुमच्याशी व तुमच्या विशिष्ट परिस्थितींविषयी बोलत आहेत. त्यामुळे ही किती अद्‌भुत बाब आहे की, या शिकवणींमधून मार्गदर्शन प्राप्त करून आपण स्वतःला आणि आपल्या जीवनाला चांदीच्या एका शानदार कॅन्व्हस्‌समान समजावे—ज्याला आपल्या साधनेद्वारे अधिक बळ, अधिक सौंदर्य मिळते आहे व आश्चर्यजनक रूपाने अधिकाधिक उजाळा मिळतो आहे.

आदरपूर्वक,
ईशा सरदेसाई

© २०२४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.